# सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

**E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७**

**Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३**


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/मेळावे/२०१२/ 9669

दिनांक :- 02/06/2012

**प्रति,**

**प्राचार्य,**

**सर्व पदविका अभियांत्रिकी अर्ज स्विकृती केन्द्र.**

**विषय :- प्रथम वर्ष पदविका प्रवेशासाठी समुपदेशन मेळावे आयोजित करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/तंशिस/२०१२/४३५ दिनांक २१/०६/२०१२.

२) या कार्यालयातर्फे आपल्या संस्थेतील अर्ज स्विकृती केन्द्र प्रमुखांना करण्यात आलेले दुरध्वनी.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून यावर्षी प्रवेश नियमावलीमध्ये अंशत: बदल करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरचा बदल सर्व पालक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याकरीता आपल्या संस्थेमार्फत तालुकास्तरावर समुपदेशन मेळावे आयोजित करण्याविषयी वरील संदर्भीय पत्र क्र. १ च्या अनुषंगाने आपल्या संस्थेतील अर्जस्विकृती केन्द्राच्या प्रमुखांना दुरध्वनीव्दारे सुचना देण्यात आल्या होत्या. या संदर्भात आपल्या संस्थेतर्फे **आतापर्यंत घेण्यात** आलेल्या समुपदेशन मेळाव्याचा अहवाल तसेच यापूढील सदरबाबतचे संपुर्ण वेळापत्रक दिनांक ७/०७/२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरीता सादर.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.inWebsite:
http://www.dte.org.in

क्रमांक :- १०/तंशिसं/२०१२/ ४३५
दिनांक :- 21 JUN 2012

प्रति,

सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती.

विषय:- प्रथमवर्ष पदविका प्रवेशासाठी समुपदेशन मेळावे आयोजित करण्याबाबत.

प्रथम वर्ष प्रवेशाची नियमावली या संचालनालयाच्या संकेतस्थळ dte.org.in/poly2012 येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. प्रवेश प्रक्रिया दिनांक ३०/६/२०१२ पासून सुरु करण्यात येणार आहे. यावर्षी प्रवेश नियमावलीमध्ये अंशत: बदल करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरचा बदल सर्व पालक तसेच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या मार्फत तालुकास्तरापर्यंत समुपदेशन मेळावे आयोजित करण्यात यावेत यासाठी विना अनुदानित संस्थाची देखील मदत घेण्यात यावी. समुपदेशन मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांना माहिती देत असताना यामध्ये खालील मुद्यांचा समावेश करण्यात यावा.

१. सन २०१२-१३ मध्ये प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना अर्ज तसेच ॲप्लीकेशन किट एआरसी सेंटरमधून खरेदी करण्यास सांगावे व किट खरेदी करताच ते प्रथमत:च एआरसी सेंटरमधून ॲक्टीव्हेट करुन घेण्याच्या सूचना द्याव्यात. किट ॲक्टीव्हेट झाल्याशिवाय विद्यार्थी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरु शकणार नाहीत.
२. प्रवेश पात्रतेमध्ये विद्यार्थी फक्त १०वी पास असणे आवश्यक आहे.
३. टयुशन फी व्हेवर योजनेसाठी उत्पन्नाची मर्यादा २.५ लाख वरुन ४.५ लाख इतकी वाढविण्यात आलेली आहे.
४. सन २०११-१२ साठी प्रवेशाच्या फेऱ्या ४ होत्या त्या कमी करुन २०१२-१३ साठी फक्त ३ प्रवेश फेऱ्या करण्यात आलेल्या आहेत.
५. यावर्षी पहिल्या पसंती क्रमांकाची संख्या ४५ वरुन १०० पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. पहिल्या फेरीसाठी ३ ऑप्शन्स बंधनकारक असून त्यापैकी अलॉटमेंट झाल्यास विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे बंधनकारक आहे.

६. दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी सर्व पसंती क्रमांकापैकी अलॉट झालेल्या संस्थेमध्ये प्रवेश घेणे बंधनकारक आहे.
७. तिसरी प्रवेश फेरी समुपदेशन पध्दतीने जिल्हास्तरावर आयोजित करण्यात येणार आहे.

वरील मुद्यांचा तसेच प्रवेशासाठी आवश्यक नियमाचा समावेश करुन पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन तयार करुन सर्व संबंधित संस्थांना देण्यात येऊन त्या अनुषंगाने समुपदेशन मेळावे आपल्या स्तरावरुन आयोजित करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाला कळविण्यात यावा.

आपला

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

desk 10C:\Documents and Settings\desk1\Desktop\attar madum\desk 10.doc